सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ७ ऑक्टोबर २०१७.

### ग्रामपंचायत निवडणुकांसाठी
### सरासरी ७९ टक्के मतदान

मुंबई, दि. ७: विविध १६ जिल्ह्यांमधील ३ हजार १३१ ग्रामपंचायतींच्या थेट सरपंचपदासह सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज प्राथमिक अंदाजानुसार सरासरी ७९ टक्के मतदान झाल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी दिली आहे.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, सध्या राज्यातील सुमारे साडेसात हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू आहे. त्यातील काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. उर्वरित ३ हजार १३१ ग्रामपंचायतींसाठी आज सरासरी ७९ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्व ठिकाणी ९ ऑक्टोबर २०१७ रोजी मतमोजणी होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात विविध १८ जिल्ह्यांतील सुमारे ४ हजार ११९ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासह सदस्यपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १६ ऑक्टोबर २०१७ रोजी मतदान होईल.

**आज मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या अशी: नाशिक-** १५०, **धुळे-** ९६, **जळगाव-** १०१, **नंदुरबार-** ४२, **अहमदनगर-** १९४, **औरंगाबाद-** १९६, **बीड-** ६५५, **नांदेड-** १४२, **परभणी-** १२६, **जालना-** २२१, **लातूर-** ३२४, **हिंगोली-** ४६, **अकोला-** २४७, **यवतमाळ-** ८०, **वाशीम-** २५४ आणि **बुलडाणा-** २५७. **एकूण-** ३,१३१.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)